# Good Work Of Nagpur Rural Police

## अनोळखी महिला व पुरूषाची ओळख पटुन त्यांचा खुन करणाऱ्या आरोपीला अटक, खापरखेडा पोलीसांची कारवाई

**पो.स्टे. खापरखेडा** :- अंतर्गत ०८ किमी अंतरावर पोलीस चौकी येथील मागील भागात पाण्याच्या कॅनालमध्ये दिनांक १३/०१/२०१७ चे पुर्वी **मृतक अनोळखी इसम, वय अंदाजे ३५ वर्ष,** यास अज्ञात आरोपीने कोणत्यातरी कारणावरून त्याच्या डोक्यावर कोणत्यातरी धारदार शस्त्राने गंभीर दुखापत करून त्यास जीवानिशी ठार केले. त्याचे प्रेत हे वलनी पोलीस चौकीच्या मागे पाण्याच्या कालव्यामध्ये पुरावा नष्ट करण्याच्या उद्‌देशाने फेकुन दिले होते. व त्याच दिवशी पोलीस स्टेशन पारशिवनी येथे त्याच दिवशी एका अनोळखी महिलेचे प्रेत हे १५ किमी अंतरावरील मौजा बखारी शिवार येथे मिळुन आले. तिच्या डाव्या हाताला जखमी करून तसेच जिवानीशी ठार करून पुरावा नष्ट करण्याच्या उद्‌देशाने वडाच्या झाडाखाली जंगलात फेकुन दिले होते. या दोन्ही इसमांच्या बाबत अनुक्रमे पोलीस स्टेशन खापरखेडा व पारशिवनी येथे कलम ३०२, २०१ भादंवि अन्वये अज्ञात आरोपीविरूद्ध गुन्हे नोंद करण्यात आले होते. सदर गुन्हयाचा तपास करीत असतांना दोन्ही पोस्टे मधील अनोळखी इसमांची ओळख पटली. पोलीस स्टेशन खापरखेडा येथील अनोळखी मृतक नामे **- कमलसिंग उर्फ जॉन ठाकुर, रा. विश्वास नगर, गिट्‌टीखदान नागपुर** तसेच पोलीस स्टेशन पारशिवनी येथील अनोळखी मृतक महिलेचे नाव **मृतक नामे- सोनाली अमरराज मेश्राम, रा. विश्वास नगर, गिट्‌टीखदान नागपुर** असे आहे. आरोपी नामे - अमरराज मेश्राम हयाला अटक करण्यात आली असुन त्याचा पीसीआर दिनांक २५/०१/२०१७ पर्यंत मिळालेला असुन पुढील तपास ठाणेदार श्री. महेश चाटे हे करीत आहे.

सदरची कारवाई ही नागपुर परिक्षेत्रचे विशेष पोलीस महानिरीक्षक श्री. प्रतापसिंह पाटणकर, नागपुर (ग्रामिण) पोलीस अधिक्षक श्री. शैलेश बलकवडे, अपर पोलीस अधिक्षक श्री. नरसिंग शेरखाने, विभागीय पोलीस अधिकारी श्री. सुरेश भोयर, श्री. लोहित मतानी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन खापरखेडा येथील पोलीस निरीक्षक श्री. महेश चाटे, श्री. गायगोले, श्री. संजय पुरंदरे, सहायक पोलीस निरीक्षक श्री. अरविंद सराफ, श्री. नितीनचंद्र राजकुमार, श्री. अहिरकर, श्री. जारवाल, सहायक फौजदार श्री. नामदेव धांडे, पोलीस नाईक श्री. बंडु कोकाटे, दिनेश

आधापुरे, सुरेंद्र वासनिक, मंगेश काळे, रवि मेश्राम, सलिम शेख, सनोडीया, मिश्रा, शेंडे, खंडाते, अजय तिवारी, चेतन राऊत, बहाळे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

टिप :- अधिक माहितीकरीता (तपासी अधिकारी पोनि. श्री. महेश चाटे यांचे फोन नंबर)

| | | |
|---|---|---|
| ९८२३४०८३४४ | ७८८८०१६९४२ | ०७११३ – २६८१२६ |

सविस्तर माहिती-

गुन्हयाच्या तपासादरम्यान श्री. गंगाधर हरिकीशन वाघपैजन, वय ५३ वर्ष, रा. विश्वास नगर, गिट्टीखदान, नागपूर यांनी पोलीस स्टेशनला येवुन त्यांची मुलगी नामे- श्रीमती सोनाली अमर मेश्राम, वय २५ वर्ष, रा. विश्वास नगर, गिट्टीखदान, नागपूर आणि त्यांचा किरायदार जॉन उर्फ कमलेशसिंग ठाकूर, मुळचा रामनगर, मैय्यर, जिल्हा जबलपूर मध्यप्रदेश ह. मु. विश्वास नगर, गिट्टीखदान नागपूर हे दोघेही दिनांक १०/०१/२०१७ पासुन त्याला काही माहीती न देता निघुन गेले आहेत आणि त्या दोघांचे मोबाईल क्रमांकांवर कॉल केला असता त्या दोघांचेही मोबाईल बंद येत असुन त्यांचे बाबत चौकशी करून त्यांना शोधुन काढण्याकरीता त्यांनी विनंती केली. त्याबाबत सदर नोंद स्टेशन डायरीला घेवुन त्यांना आमचेकडील उपरोक्त दाखल गुन्हयातील अनोळखी ईसमाचे फोटो दाखविले असता त्यांनी सदर फोटो हा त्यांची मुलगी सोनाली आणि त्यांचे घरी राहणारा जॉन उर्फ कमलेशसिंग ठाकूर, मुळचा रामनगर, मैय्यर जिल्हा जबलपूर मध्यप्रदेश ह.मु. विश्वास नगर, गिट्टीखदान नागपूर याचे असल्याचे कळविले.

त्यावरून आम्ही दोन सरकारी पंच १) सतिश महादेव वाघाडे, वय २७ वर्ष, रा. वार्ड नंबर २, पिंपळकर याचे घरी किरायाने आणि २) नरेश पुंडलीक येलमुले, वय २४ वर्ष, रा. वार्ड नंबर २ तुरणकर याचे घरी किरायाने यांना सोबत घेवुन श्री. गंगाधर हरिकीशन वाघपैजन, वय ५३ वर्ष, रा. विश्वास नगर, गिट्टीखदान, नागपूर यांचेसह मेयो हॉस्पीटल येथील मर्च्युरी मध्ये मृतक जॉन आणि अनोळखी पोलीस स्टेशन पारशिवनी येथील अपराध

क्रमांक ०४/१७ कलम ३०२, २०१ च्या ओळख पंचनामा करण्याकरीता रवाना झालो. मेयो रूग्णालय नागपुर येथे पोहचुन थोडयाच वेळात तेथे सपोनि राजकुमार, ए. एस. आय धांडे, नापोशि. दिनेश, नापोशि. सर्वेश, नापोशि सुरेंद्र, नापोशि बंडु , नापोशि सलिम दोन पंचासमक्ष स्वीपर शुक्ला यांनी नमुद गुन्हयात शितगृहात सरंक्षित करून ठेवलेले अनोळखी ईसमाचे प्रेत श्री. गंगाधर हरिकीशन वाघपैजन यांना सि-९ मधून दोन वरील पंचासमक्ष काढुन दाखविले असता त्यांनी सदर प्रेताची ओळख जॉन उर्फ कमलेशसिंग ठाकुर, रा. रामनगर, ता.मैयर, जि.जबलपुर, राज्य मध्यप्रदेश हा असल्याचे व तो त्यांचे घरात मागील ८ वर्षापासुन भाडयाने राहात असल्याचे सांगितले. श्री गंगाधर वाघपैजन यांनी यातील अज्ञात मृतक याची ओळख पटविली असल्याने त्याबाबतचा पंचनामा तयार करण्यात आला. सदर पंचनामा कागदपत्रात सामील करण्यात आला.

यातील साक्षीदार श्री गंगाधर वाकपैजन यांना सविस्तर विचारपुस केली असता त्यांनी आपले जाबाबात पुढील प्रमाणे खुलासा केला आहे.

''माझे नाव गंगाधर हरिकीशन वाघपैजन, वय ५३ वर्ष, व्यवसाय : हातमजूरी, रा. विश्वास नगर, गिट्टीखदान, नागपूर असे आहे. माझी मुलगी सोनाली ही पुनम चेंम्बर मधील सुपर मार्केट मध्ये काम करत होती. त्यावेळी अमर नावाचा मुलगा तीचे मागे लागला होता व तिला लग्न कर म्हणुन त्रास देत होता. काही दिवसा नंतर सोनाली हीने घरी सांगीतले की, तिला अमर पसंत आहे. मुलीच्या जिद मुळे आम्ही तिचे लग्न अमर सोबत लावून देण्याचे ठरविले. आम्ही अमर याला भेटलो तेव्हा त्याने त्याचे नाव अमर जंगलूजी मेश्राम असे सांगीतले. व तो मुळचा पारशिवनी येथील राहणारा असुन त्याचे वडील डब्ल्यूसीएल माईन्स् वलनी येथे नोकरीस असल्याने त्याचे आई वडील डब्ल्यूसीएल कॉलनी वलनी येथे राहतात असे अमरने सांगीतले. त्याने आम्हाला सांगीतले की, त्याचे वडील खुप दारु पितात त्यामुळे ते जास्त कोणा सोबत बोलचाल करत नाही. अमर याचे नाव मेश्राम असल्याने तो आमचे समाजाचा आहे अशी आमची समज झाली. तसेच

मुलीने त्याला पसंत केल्यामुळे आम्ही त्यांच्या लग्नाला तयार झालो. अमर आणि सोनाली यांचे लग्नाला ५ वर्ष झालेले असुन त्यांना ३ वर्षाचा मुलगा आहे, त्याचे नाव अजिंक्य आहे. माझे मुलीचे लग्न अमर मेश्राम याचे सोबत झाल्यानंतर ते महाल येथे राहत होते. काही दिवसांनंतर सोनाली हिने आम्हाला सांगीतले की, अमर बरोबर कामधंदा करताना ही त्यामुळे घरी खुप अडचणी येत आहे. त्यामुळे मी माझे मुलीला माझे घरी येवून रहाण्यास सांगीतले. काही दिवसानंतर अमर आणि सोनाली हे माझे घरी रहायला आले. अमर हा इलेक्ट्रीकचे काम करतो. माझे ८ रुमचे बांधकाम असलेले घर आहे. त्यापैकी मी ४ रुममध्ये राहतो. मुलगी सोनल व जावई यांना १ रुम रहायला दिली आहे. आणि १ रुम मध्ये जॉन नावाचा मुलगा किरायदार म्हणुन राहतो. मागील ८ वर्षापासुन माझे घरी जॉन उर्फ कमलेशसिंग ठाकूर हा किरायदार म्हणुन आहे. जॉन हा मुळचा रामनगर, मैय्यर, जिल्हा जबलपूर मध्यप्रदेश येथील राहणारा आहे. जॉन सदर, नागपूर परिसरातील बारबेक्यू हॉटेल मध्ये वेटरचे काम करतो. जॉन हा स्वभावाने चांगला होता. त्याचे आमचे घरी नेहमी उठने-बसने होते. बरेच वेळा तो माझे घरी व माझे मुलीच्या घरी जेवण करत होता. जॉन हा हॉटेल मध्ये वेटर असल्याने तो हॉटेल मधुन घरी येतांना सोबत चिकन मटन, दारु घेवून येत होता त्यामुळे माझे जावई अमर याचे सोबत त्याचे नेहमी दारु पिणे मटन चिकणची पार्टी चालत असल्याने त्यांची चांगली बैठक होती. माझी मुलगी सोनाली आमच्या मोहल्ल्या जवळील के.टी. नगर येथील एका बंगल्यात स्वयंपाक करायचे कामाला जात होती. ती ज्यांचे कडे कामाला जायची सध्या त्यांचे नाव मला आठवत नाही पण मला त्यांचा बंगला माहीत आहे. माझे जावई अमर हे मागील २ वर्षापासुन घरा जवळील एका अपार्टमेंन्ट मध्ये इलेक्ट्रीक मेन्टनन्सचे काम करतो.

माझा जावई जॉन सोबत दारु पित असल्याने मुलगी व जावई यांचेमध्ये अधुन मधुन घरगुती भांडणे होत होती. याच कारणावरुन जावाई मुलीला नेहमी मारहाण

करत होता. तो मुलीला म्हणत होता की ‘‘तेरे चालचलन ठिक नही, तेरे को एक दिन मारुंगा’’ असे म्हणुन मुलीवर शक करत होता. आम्ही बरेच वेळा त्याला समजविण्याचा प्रयत्न केला पण तो दारु जास्त पिऊ लागल्याने जावई आणि मुली यांच्यात भांडणे वाढली होती. काही दिवसांपुर्वी माझा नातू अजिंक्य हा घराजवळ खेळत असतांना अचानक गायब झाला. आम्ही त्याचा शोध घेतला पण तो मिळून आला नाही. आम्हाला माहित पडले की, मुलाला अमर हा आपल्या सोबत घेवून गेला आहे. त्यामुळे आम्ही अमरला विचारले असता त्याने इनकार केला. म्हणुन आम्ही अमरचे विरुध्द पोलीस स्टेशन गिट्टीखदान येथे रिपोर्ट दिली त्यामुळे अमरने माझा नातू अजिंक्य याला घरी परत आणुन दिले.

दि. ०९/०१/२०१७ रोजी सकाळी १०.०० वाजताचे सुमारास अमर याने जॉनला त्याचे कामावर सोडतो म्हणुन सोबत घेवून गेला असे मला माझी मुलगी सोनाली हीने सांगीतले होते.

दि. १०/०१/२०१७ रोजी सकाळी ७.३० वाजताचे सुमारास माझी मुलगी सोनाली ही तीचे कामावर निघुन गेली. थोडयावेळाने अमर पण मुलीचे मागे-मागे जात असल्याचे मी पाहीले. जॉन, सोनाली आणि अमर घरी परत आले नाही म्हणुन आम्हाला वाटले की, सोनाली आणि अमर हे जॉन सोबत त्याचे गावी गेले असावे. असे आम्हाला वाटले होते पण ते त्यांचे गावी गेले नाही असे आम्हाला समजले तेव्हा आम्ही सोनालीचा शोध घेतला पण ती आम्हाला मिळाली नाही. म्हणुन पोलीस स्टेशन गिट्टीखदान येथे सोनाली हिचे हरविल्याबाबत रिपोर्ट देण्याकरीता गेलो तेव्हा तेथील पोलीसांनी आम्हाला सांगीतले की, आम्ही सोनाली व जॉनच्या वर्णना बाबत जी माहिती पोलीसांना दिली त्यावर्णनाचे अनोळखी प्रेत खापरखेडा पोलीसांना सापडले आहे. त्यावरुन आम्ही पोलीस स्टेशन खापरखेडा येथे येवून आपल्याला भेटलो व माझी मुलगी सोनाली आणि जॉन हिचे वर्णन आपल्या सांगीतले.

त्यावर आपण मला एका अनोळखी मृत पुरुषाचे फोटो दाखविले. ते फोटो पाहुन तो मृत इसम जॉन असल्याचे मी आपल्याला सांगीतले.

साक्षीदार श्री. गंगाधर वाकपैजन यांनी दिलेल्या जबाबानंतर त्यांचा मुलगा साक्षीदार श्री. आशिष गंगाधर वाकपैजन याचा जबाब नोंदविण्यात आला असता त्याने गुन्हयासंबधात पुढील प्रमाणे महत्वपुर्ण खुलासा केलेला आहे.

''माझे नाव आशिष गंगाधर वाकपैजन, वय २६ वर्ष, व्यवसाय : खाजगी काम, रा. विश्वास नगर, गिट्टीखदान, नागपूर आहे. आमचे घरी दोन किरायदार राहतात. त्यापैकी एक भाऊलाल मिश्रा नावाचे इसम असुन ते खाजगी काम करतात. दुसरा इसम हा जॉन उर्फ कमलेशसिंग आहे. तो सदर येथील बारबेक्यू हॉटेल मध्ये वेटरचे काम करतो. जॉन हा मुळचा रामनगर, मैय्यर जि. जबलपूर, मध्यप्रदेश येथील रहीवासी आहे. तो आमचेकडे मागील ८ वर्षापासुन किरायदार म्हणुन राहतो. जॉन सोबत आमचे परिवाराचे चांगले संबंध आहे. त्याचे नेहमी आमचे घरी येणे-जाणे असते. जॉनची खोली व माझी बहीण सोनाली हिला रहायला दिलेली खोली आजू बाजुला असल्याने जॉनचे माझी बहीन सोनाली व जिजाजी अमर यांचेसोबत चांगले संबध असल्याने ज्याचे त्यांचेकडे सुध्दा नेहमी उठने बसने आहे. माझी बहीन सोनाली व जिजाजी अमर यांचे नेहमी घरगुती भांडण होत होते. त्यांचे पारिवारीक भांडण असल्यामुळे आम्ही त्यांचेमध्ये जास्त दखलअंदाजी करत नव्हतो पण कधी कधी माझे आई-वडील त्यांना समजविण्याचा प्रयत्न करीत होतो की, चांगला संसार करा भांडणे करु नका. काही दिवसांपासुन त्यांचेमध्ये जास्त भांडणे होवू लागली याचे नक्की काय कारण होते हे मला माहित नव्हते.

दि. ०९/०१/२०१७ रोजी सकाळी १०.०० वाजताचे सुमारास मी माझे घरी हजर असतांना माझे जिजाजी त्यांचे मोटर सायकलवर बसवून जॉनला कोठेतरी बाहेर घेवून जातांनी मला दिसले होते. मी माझे कामावर निघुन गेलो. दुपारी मी कामावरुन घरी जेवण

करायला आलो तेव्हा मी माझे बहीनीला विचारले की, सकाळी जिजाजी जॉन सोबत बाहेर जातांना दिसले. त्यावर माझी बहीन सोनाली मला म्हणाली की, तुझे जिजाने जॉनला त्याचे कामावर सोडले असे सांगत होते.'' त्याचदिवशी संध्याकाळी ८.३० वाजताचे सुमारास जॉन व माझे जिजाजी अमर हे मला गिट्टीखदान येथील दारुच्या दुकाना समोर उभे दिसले. बहुतेक जॉन व माझे जिजाजी यांनी दारु पिली असावी. माझे जिजाजीने जॉनला आपले मोटर सायकलवर बसविले व दोघेही तेथुन निघुन गेले. यानंतर मी घरी येवून ही गोष्ट सोनाली हिला सांगीतली होती.

वरील साक्षीदारांनी दिलेल्या जबाबावरुन सदर गुन्हयातील अनोळखी इसमांची ओळख पटली असुन साक्षीदार श्री गंगाधर वाघपैजन यांचा जावई संशयीत इसम नामे-अमर जंगलुजी मेश्राम हा अचानक बेपत्ता असल्याने त्याचा सदर गुन्हयाशी संबध असण्याची दाट शक्यता वाटत असल्याने तो संशयीत असल्याचे प्राथमिकदृष्टया निदर्शनास आले. संशयीत अमर मेश्राम हाती लागल्यास सदर गुन्हा उघडकीस येण्याची शक्यता वाटत असल्याने सदर गुन्हयासंबंधाने संशयीत इसम नामे-अमर मेश्राम याचा शोध घेवुन त्याला विचारपुस करणे आवश्यक असल्याने सपोनि श्री. राजकुमार, स.फौ. १२४६, नापोशि ८२१, ९८०, १५१, ४३७ चालक नापोशि १८३५ यांना सरकारी वाहनाने शोधकामी रवाना करण्यात आले.

सपोनि राजकुमार यांना गुप्त बातमीदाराने माहिती दिली की, अमर मेश्राम हा इटगांव, मौदा येथे नातेवाईकाच्या घरी थांबलेला आहे. मिळालेल्या बातमीवरुन सपोनि राजकुमार आणि सोबतचा स्टाफ इटगांवकडे रवाना झाले. सदर पोलीस पथकास पुन्हा बातमीदाराने माहीती दिली की, अमर हा इटगांव वरुन गुमगांव मार्गाने कामठीकडे जाण्यास निघाला आहे. त्याने अंगात निळा रंगाचा जिन्स पॅन्ट व काळया रंगाचे शर्ट असे कपडे घातलेले आहे. प्राप्त माहितीवरुन पोलीस पथक कामठी येथे रवाना झाले. सदर पथकाने गुमगाव मार्गावरुन कामठी कडे येणाऱ्या वाहनांची तपासणी केली. परंतु अमर

मिळून आला नाही. पोलीस पथकाने कामठी येथील रेल्वे स्टेशन, बस स्टॅन्ड, ऑटो रिक्षा स्टॅन्ड, पेट्रोलपंप आणि कामठी शहरातील मुख्य रस्त्यांवर अमरचा शोध घेतला असता गुप्त बातमीदाराने अमर चे वर्णन सांगीतले होते त्या वर्णनाचा एक मुलगा हा पोलस स्टेशन कामठी, नागपूर शहर येथुन थोडयाच अंतराव रस्त्याचे बाजूला उभा असलेला पोलीस पथकाचे निदर्शनास आला. पोलीस पथकाने सदर इसमास विचारपुस केली असता तो अमर मेश्राम असल्याची पोलीसांची खात्री झाल्याने पोलीसांनी त्याला ताब्यात घेवुन आमचेसमक्ष पोलीस स्टेशन खापरखेडा येथे हजर केले.

आरोपीस आम्ही सदर गुन्हयासंबंधाने विचारपुस केली असता त्याने सदर गुन्हा केला असल्याचे कबुल करून त्याचे गुन्हेगारी कृत्य व गुन्हयात वापरलेल्या कार्यपध्दतीबाबत पुढील प्रमाणे महत्वपुर्ण खुलासा केला आहे.

‘‘माझे नाव अमरराज जंगलूजी मेश्राम, वय २७ वर्ष, व्यवसाय : इलेक्ट्रीशियन आणि लिफ्ट टेक्नीशियन, रा. विश्वास नगर, गिट्टीखदान, नागपूर आहे. मी नमुद पत्त्यावर पत्नी आणि मुलासह वास्तव्यास असुन लिफ्ट टेक्नीशियनचे काम करतो. विश्वास नगर येथे राहणारे श्री गंगाधर वाघपैजन यांच्या तिसऱ्या क्रमांकाची मुलगी सोनाली, वय २५ वर्षे हिचेसोबत माझे लग्न ५ वर्षापुर्वी झाले आहे. सोनाली ही पुनम चेम्बर, नागपूर येथील एन.कुमार यांचे सुपर बाजार मध्ये नोकरी करीत होती. माझे पुनम चेम्बर येथे कामानिमित्त जाणे येणे होते. त्यामुळे माझी व सोनालीची ओळख झाली होती कालांतराने आमचे प्रेमसंबध जुळले. आम्ही दोघांनी लग्न करायचे ठरविले होते, पण या लग्नाकरीता माझे आई वडीलांचा विरोध होता. त्यामुळे मी त्यांचे विरुध्द जावून सोनाली सोबत प्रेमविवाह केला. लग्न झाल्यानंतर आम्ही महल येथे २ वर्ष राहीलो. मला एक मुलगा आहे. त्याचे नाव चि. अजिंक्य असुन तो ३ वर्षाचा आहे. सोनाली हिचे मर्जीने मागील ३ वर्षापुर्वी आम्ही तिचे आई वडीलांचे घरी विश्वास नगर, गिट्टीखदान येथे रहायला गेलो. तेव्हापासुन आम्ही सासऱ्यांचे घरी राहतो. माझे सासरे श्री गंगाधर यांचे घर ६ खोल्यांचे होते. त्यापैकी त्यांनी

आम्हाला रहायला १ खोली दिली होती. माझे सासऱ्याने त्यांचे घरामध्ये आमचे खोलीच्या बाजूला जॉन नावाच्या मुलाला १ खोली किरायाने दिलेली होती. उर्वरित खोल्यांमध्ये माझे सासू-सासरे, साळा आकाश आणि साळी कु. अश्विनी हे राहत होते. जॉन हा माझे सासरे यांचे घरी मागील ८ वर्षापासुन किरायदार म्हणुन राहत होता. त्यामुळे त्याचे माझे सासरच्या मंडळीसोबत घरगुती संबंध तयार झाले असल्याने तो माझे घरी व सासऱ्याचे घरामध्ये घरातील सदस्यांप्रमाणे वावरत होता. जॉन हा मुळचा मैय्यर जिल्हा जबलपूर, मध्यप्रदेश येथील रहीवासी होता. व तो सदर, नागपूर परिसरातील बारबेक्यू हॉटेल मध्ये वेटरचे काम करीत होता. सर्व काही सुरळीत चालू होते व आमचा संसार चांगला सुरु होता. मागील ३ ते ४ महिण्यापासुन माझी पत्नी के.टी. नगर येथे एका बंगल्यावर स्वयंपाक करण्याचे कामाला जात होती. सध्या त्यांचे नाव मला आठवत नाही. माझे काम पण नियमीत सुरु होते. मी माझे लिफ्ट दुरुस्तीचे कामाधुन दर महिन्याला १० ते १२ हजार रुपये कमावत होतो. त्यामधुनच आमचा उदरनिर्वाह चालत असे. काही दिवसांपासुन मला माझी पत्नी सोनाली हिचे बोलणे व वागण्यामध्ये अचानक बदल झाल्याचे जानवत होते. ती माझे सोबत पुर्वीसारखी वागत नव्हती. आमचे संबधामध्ये दिवसेंदिवस कटूता निर्माण झाली होती. यातुनच आम्हा पती पत्नीमध्ये वादविवाद वाढत होता. मी माझेपरीने पत्नीला नेहमी आनंदात ठेवण्याचा पुर्ण प्रयत्न करीत होतो. परंतु माझी पत्नी हीचे समाधान होत नव्हते. तीचे वागणे पुर्णपणे बदलत जात होते.

माझी कमाई ही मोजकीच होती. त्यात आमचा उदरनिर्वाह चांगला सुरु होता, परंतु माझी पत्नी हीचेकडे मला महागडे मोबाईल फोन ज्यामध्ये ओप्पो कंपणी आणि सॅमसंग कंपणीचे स्मार्टफोन दिसुन आले. मी माझे पत्नीला सदर मोबाईल फोन कसे खरेदी केले व यासाठी पैसे कूठून आणले याबाबत विचारपुस केली असता तीने मला सांगीतले की,

तीने थोडी थोडी बचत करुन पैसे जमा केले व त्या पैशातुन सदरचे मोबाईल फोन खरेदी केले. मी तीच्या बोलण्यावर विश्वास ठेवून याकडे दुर्लक्ष केले.

काही दिवसांपुर्वी मला माझे पत्नीकडे काही सोन्याचे दागीने दिसले. सदर दागीने तिने इतवारी येथील निकम ज्वेलर्स यांचेकडून खरेदी केल्याचे मला समजले. मी तीला सदर दागीने खरेदी करण्याकरीता पैसे कोठून आणले याबाबत विचारणा केली तेव्हा तिने मला यावेळी सुध्दा ‘‘ थोडी थोडी बचत करुन पैसे जमविले व त्यातुन दागीने खरेदी केले.’’ असे सांगीतले. मला माझे पत्नीचे वागणुकीबाबत संशय निर्माण होवू लागला. माझे सासू व सासरे यांची आर्थिक परिस्थतीत विशेष चांगली नव्हती त्यामुळे सोनाली हिला त्यांचेकडून पैश्यांची मदत मिळाली नाही याची जाणीव मला होती. माझे मनात सोनाली हिचे बाबत संशय वाढत चालला होता.

काही दिवसांपुर्वी मी माझे कामावरुन रात्री सुमारे ०१.०० वाजताचे दरम्यान उशीरा घरी परत आलो होतो मी माझे खोलीचे आत जाणार होते त्यावेळी मला माझे खोलीच्या आतमध्ये माझी पत्नी सोनाली आणि जॉन हे बोलत असल्याचा आवाज ऐकू आला. मी खोलीच्या बाहेर थांबुन होतो. थोडयावेळाने जॉन हा माझे खोलीच्या बाहेर आला व त्याच्या खोलीमध्ये निघुन गेला. एवढया रात्री जॉन व माझी पत्नी एकत्र माझे खोलीमध्ये कसे काय हजर होते याबाबत माझे डोक्यात विवीध विचार येवू लागले. सदर परिस्थीती माझेसाठी धक्कादायक होती. मी याबाबत माझे पत्नीला बोललो असता तीने मला रागाने म्हटले की, ‘‘मी त्याला राखी बांधते, त्याच्यात व माझ्यात बहीण भावाचे नाते आहे.’’ असे म्हणुन माझे सोबत भांडण केले. त्यावेळी आमचे मध्ये चांगलेच भांडण झाले. मला आता माझी पत्नी सोनाली आणि जॉन यांचेमध्ये अनैतिक संबध असल्याची जाणीव झाली. त्यामुळे मी माझी पत्नी हिचेवर पाळत ठेवण्यास सुरवात केली. मी माझे पत्नीला कामावर जात आहो असे सांगुन घरुन निघुन जात होतो. व घराचे जवळच लपुन पत्नीवर नजर ठेवू

लागलो. याचदरम्यान मला जॉन हा माझे खोलीमध्ये सोनाली हीला भेटण्याकरीता जात असल्याचे दिसुन आले. तो खोलीमध्ये गेल्यावर सोनाली खोलीचा दरवाजा आतुन बंद करत होती. बराच वेळ जॉन व सोनाली खोलीमध्ये एकटे राहत होते. जॉन आणि सोनाली हयांना रंगेहाथ पकडण्याकरीता एक दिवस मी माझा मोबाईल फोनचा कॅमेरा सुरु करुन माझे खोलीमध्ये ठेवला होता. जॉन हा माझे खोलीमध्ये गेला तेव्हा कॅमेरा सुरु असल्याने त्यांचेमध्ये झालेले बोलणे व त्यांचे कृत्य सदर कॅमेऱ्याव्दारे रेकॉर्ड झाले. सदर रेकॉर्डींग मी पाहीली तेव्हा जॉन व माझी पत्नी सोनाली हिचे मध्ये अनैतिक संबध असल्याची माझी खात्री पुर्णपणे झाली.

जॉन आणि माझी पत्नी यांचे संबधाबाबत मला खात्री पटल्यावर मी माझी पत्नी व जॉन यांचे प्रत्येक हालचालीवर लक्ष ठेवू लागलो. रात्रीचे वेळी मी पत्नीला कामाला जात आहो असे सांगुन घरुन निघुन जात होतो व घराचे पाठीमागील बाथरुमचे छतावर जावून लपून बसत होतो. मध्यरात्री घरातील सर्व मंडळी झोपी गेल्यावर जॉन हा त्याचे खोलीमधुन बाहेर येत होता व माझे खोलीकडे जातांना मला दिसत असे. माझी पत्नी जॉन याने आवाज दिल्यावर खोलीचा दरवाजा उघडत असे आणि जॉन याने खोलीत प्रवेश केल्यावर माझी पत्नी खोलीचा दरवाजा आतुन बंद करत होती. जॉन आणि माझी पत्नी यांचेमध्ये शारिरीक संबध झाल्यावर जॉन त्याच्या खोलीमध्ये निघुन जात होता. जॉन व माझी पत्नी सोनाली हिचे सदरचे कृत्य पाहीन माझे मनात जॉन आणि माझी पत्नी यांचे विषयी चिड निर्माण झाली होती.

जॉन हयाचे अनैतिक संबध माझी मोठी साळी कु. अश्विनी हिचे सोबत बरेच वर्षापासुन होते ही गोष्ट मला माहित होती. पण त्याचे माझे पत्नी सोबत असे संबध असेल याबाबत मी कधीही कल्पना केली नव्हती. परंतु माझेसमोर जी परिस्थिती आली व मी जे माझे डोळयाने पाहीले त्यावरुन माझे मनात दिवसेदिवस जॉन व माझी पत्नी यांचेबद्दल चिड

वाढत गेली. मी सदर बाब माझे सासू-सासरे यांना सांगण्याचा प्रयत्न केला परंतु जॉन हा हॉटेल मध्ये वेटरचे काम करीत असल्याने तो त्यांना नेहमी खाण्यापिण्याच्या पार्टी देत असे त्यामुळे त्यांनी सोनाली आणि जॉनची बाजू घेतली. सोनाली आणि अश्विनी हीचे कृत्य तीच्या घरच्या मंडळींना माहीत होते पण तीच्या घरचे लोक त्यांची बाजू घेत होते. यातुनच माझे व सोनालीच्या पारिवारीक संबधामध्ये दिवसेदिवस तनाव वाढत गेला. मी माझे पत्नीला जॉन सोबत असलेले संबध बंद करण्याचे वारंवार सांगीतले परंतु माझी पत्नीने तीचे जॉन सोबत संबध नाही असे म्हणुन नेहमी नाकारत होती.

दि. ०७/०१/२०१७ रोजी जॉन आणि माझी पत्नी सोनाली हीला मी माझे खोलीमध्ये शारिरीक संबध करतांना पाहीले त्याचवेळी जॉन आणि माझी पत्नी सोनाली हयांना संपविण्याचा विचार मी मनात आणला व संधीची वाट पाहु लागलो. दि. ०९/०१/२०१७ रोजी सकाळी १०.०० वाजताचे सुमारास मी जॉनला त्याचे कामावार सोडण्याकरीता जात आहो असे माझी पत्नी सोनाली हीला सांगीतले व जॉनला घेवून माझे मोटर सायकलने घरुन निघालो. त्यावेळी माझेसोबत जॉनला जातांना माझा साळा आशिष याने आम्हाला पाहीले होते. मी जॉनला घेवून सदर येथे आलो व त्याला दारु पाजली. त्यानंतर मी जॉनला घेवून दिवसभर नागपूर शहरात मोटर सायकलवर फिरत होतो. संध्याकाळी पुन्हा ८.०० वाजताचे सुमारास मी जॉनला गिट्टीखदान चौका जवळील देशी दारुच्या भट्टीवर घेवून गेलो व तेथे दारु पाजली यादरम्यान मी जॉनला पुन्हा दारु पाजली. सुमारे अर्ध्या तासानंतर मी जॉनला तेथुन सोबत घेतले व मोटर सायकलने निघाले. रस्त्यामध्ये मला माझा साळा आशिष दिसला होता. त्याने जॉनला व मला सोबत पाहीले असावे असे मला वाटते. दिवसभर फिरल्यानंतर मी रात्री वलनी येथे जाण्याकरीता निघालो. दारु जास्त पिल्यामुळे जॉन शुध्दीवर नव्हता याचा फायदा घेवून पिपळा मार्गाने मी जॉनला घेवून रात्री १०.०० वाजताचे सुमारास वलनी पोलीस चौकीचे बाजूला असलेल्या ग्राउंडमध्ये

घेवून आलो. थंडीचे दिवस असल्याने परिसरात कुणीही लोक दिसुन आले नाही. सर्वत्र शांतता होती. सदर ग्राउंडमध्ये काटेरी झुडपाचे आड मी जॉनला जिवे ठार माण्याचे उद्देशाने त्याच्या डोक्यावर मोठा सिमेंटचा दगड मारला. जॉनचा जिव गेला नव्हता त्यामुळे मी पुन्हा जॉनच्या चेहऱ्यावर त्याच दगडाने मारले. जॉनचा जिव पुर्णपणे गेला नसल्याने पुन्हा दगडाने त्याचे डोक्यावर मारले. असे मी पाच ते सहा वेळा दगडाने ठेचून जॉनला जिवे ठार केले. त्यानंतर मी जॉनचा खिशातील मोबाईल फोन व त्याचे पैश्याचे पर्स आणि त्याच्या चप्पल काढून स्वताजवळ ठेवल्या व त्यानंतर जॉनचे मृत शरिर कुणालाही मिळू नये म्हणुन मी जॉनच्या मृत शरिराला ओढत ओढत ग्राउंडच्या बाजूला असलेल्या पाण्याच्या कॅनल जवळ आनले व जॉनच्या मृत शरिराला पाण्याच्या कॅनलमध्ये टाकले. त्यानंतर मी जॉनला ज्या दगडाने मारले होते ते दगड उचलून त्याच पाण्याच्या कॅनल मध्ये फेकून दिला. माझे वडील हे वलनी खदान मध्ये नोकरीस असल्याने माझे आई वडील डब्ल्यू.सी.एल. कॉलनी वलनी येथे राहतात. त्यामुळे मी कॉलनीमध्ये जावून आई वडीलांची भेट घेतली. व मी त्यांचे ईच्छेविरुध्द सोनाली सोबत केलेल्या लग्नामुळे मला पश्चाताप होत असल्याचे त्यांना सांगीतले. त्यानंतर मी तेथुन निघुन आपले घरी आलो.

दि. १०/०१/२०१७ रोजी सकाळी ७.३० वाजताचे सुमारास सोनाली तिचे कामावर निघुन गेली. १०.३० वाजताचे सुमारास मी सोनाली ही के.टी. नगर येथे ज्या बंगल्यावर काम करीत होती तेथे जावून सोनाली हिला भेटलो आणि तिला बाहेर जायचे आहे असे सांगुन सोबत चालण्यास म्हटले. त्यावर सोनाली माझे सोबत जाण्यास तयार झाली. मी सोनाली हिला मोटर सायकलने घेवून नागपूर वरुन निघालो. मी सोनाली हिला खापरखेडा येथील चनकापूर, रोहणा, इटगांव, पोटा या मार्गाने पारशिवनी येथील बखारी या जंगलामध्ये घेवून आलो. सोनाली हिने मला ''इथे कशाला आणले'' असे विचारले. त्यावर मी तीला जॉन व तिचे संबधाबाबत विचारुन जे काही करत आहे ते बंद कर असे

सांगीतले. पण सोनाली हिने जॉन व तिच्या संबधाबाबत इनकार केला. माझे मनात सोनाली हिला संपविण्याचा विचार पुर्वीपासुन होता त्यामुळे मी सोनाली हीचे गळयात असलेल्या ओढणीने तिचा गळा आवळला त्यावर ती खाली पडली. सोनाली हि मेली नसावी असे मला वाटल्याने मी माझे जवळ असलेल्या ब्लेडने सोनाली हिचे डाव्या हाताच्या कलाईची नस कापली. आणि सोनाली हिचा मृतदेह त्याचठिकाणी सोडून निघून गेलो.



खापरखेडा पो.स्टे.चे ठाणेदार श्री. महेश चाटे सोबत तपास पथकातील अधिकारी व कर्मचारी

## राष्ट्रीय महामार्गावर ट्रक चालकांना लुटणारी टोळी गजाआड
## स्थानिक गुन्हे शाखा व सायबर सेल ची कामगिरी

दिनांक २६.१२.२०१६ रोजी पोलीस स्टेशन मौदा हद्दीतील मौजा बोरगाव शिवारात ट्रक क्र. सीजी - ०४/जेए- ९३८४ हा रायपुर कडुन नागपूर कडे लोखंडी सलाख घेवु येत असलेला ट्रक डिझेल संपल्याने ट्रक चालक नामे- भुवनेश्वर जयपाल परसगाय याने रोडचे कडेस उभा करून मालकाशी संपर्क केला. परंतु काही कारणास्तव मालकाने चालकास मदत न पुरवू शकल्याने तो ट्रक दिनांक २६.१२.२०१६ ते २७.१२.२०१६ रोजी तिथेच उभा राहिला. नेमकी हिच संधी साधुन दरोडेखोरांनी मध्यरात्रीच्या दरम्यान ट्रक मध्ये जबरीने प्रवेश करून ट्रक चालकाला मारहाण करून त्याचे हातपाय व डोळयाला पट्टी बांधुन फिर्यादी व ट्रकसह तेथुन पळुन गेला. जिल्हा भंडारा येथील अडयाळ मार्गावर ट्रक चालकास गाडी खाली उतरवुन जंगलात एका झाडाला दोरीने बांधुन ठेवले व ट्रक पळवुन नेला. अशा फिर्यादीच्या रिपोर्ट वरून पोस्टे मौदा येथे अप.क्र. ६७३/१६ कलम ३४२, ३६५, ३९२, ३४ भादंवि चा गुन्हा नोंद करून तपास घेण्यात आला.

मौदा पोलीसांनी तात्काळ हालचाल करून ट्रकचा शोध घेण्याचा प्रयत्न केला असता मौजा अडयाळ जवळ फिर्यादीचा ट्रक मिळुन आला परंतु त्या ट्रक मधील ०५ टन लोखंडी सलाख, बॅटरी असा एकुण किंमत २,६१,४००/- रू. चा माल दरोडेखोरांनी लुटून नेला.

महामार्गावरील दरोडयास पोलीस अधीक्षक श्री. अनंत रोकडे यांनी गांर्भीयांने घेवुन तात्काळ स्थानिक गुन्हे शाखा येथील पोलीस निरीक्षक श्री. संजय पुरंदरे यांना समांतर तपासाबाबत आदेशित केले. त्यावरून स्थानिक गुन्हे शाखा येथील अधिकारी व कर्मचारी यांनी महामार्गावरील ट्रान्सपोर्ट व इतर गुप्त बातमीदारांना सदर घटनेबाबत माहिती देवुन गुन्हयाची उकल करण्याचा प्रयत्न सुरू केला. आणि त्या प्रयत्नांना यश येवुन गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, सदर ट्रक पळवुन नेणारा इसम हा पांडे नावाचा चालक असुन तो नियमीत नागपूर-रायपुर मार्गावर ट्रक चालवितो. स्थानिक गुन्हे शाखाने त्या धाग्यास पकडुन तात्काळ तपासाचे सुत्र हलविले. तपासादरम्यान दिनांक ०९.०१.२०१७ रोजी सदर गुन्हयातील आरोपी नामे - अपिजीत उर्फ अभिजीत पांडे यास पारडी येथील ट्रान्सपोर्ट ऑफिस मधुन ताब्यात घेतले. पोलीसी खाक्या दाखविताच आरोपीने गुन्हयाची

कबुली देवुन त्याचे इतर साथीदारांचे नावे व ठावठिकाणे पोलीसांना सांगितले. नागपुर ग्रामिण पोलीसांनी क्षणांचा विलंब न करता वेगवेगळया अधिकारांच्या नेतृत्वात चमु बनवुन आरोपींना इतवारा, मोठा ताजबाग, वर्धमाननगर, जसवंत टॉकीज येथुन जेरबंद केले. सदर पोलीसांनी गुन्हा करणारे ०६ आरोपी व माल विकत घेणारा ०१ असे एकुण ०७ आरोपी जेरबंद करून त्यांनी गुन्हा करतांना रेकी करण्याकरीता वापरलेल्या ०२ मोटर सायकली आरोपींकडुन जप्त करण्यात आल्या. स्थानिक गुन्हे शाखा येथील अधिकारी व कर्मचारी नी नमुद गुन्हयात १) अपीजीत उर्फ अभिजीत पांडे, २) जगदीश पांडे, ३) सचिन साहु, ४) फैजान खान, ५) शेख अशरफ, ६) सलमान बाबा खान व ७) मनोज साहु सर्व रा. नागपूर यांना अटक केली.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. अनंत रोकडे, नागपूर ग्रामीण, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. नरसिंग शेरखाने ना.ग्रा. यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री संजय पुरंदरे, सपोनि उल्हास भुसारी, सपोनि पुरूषोत्तम अहेरकर, सपोनि अजबसिंग जारवाल, नापोशि मंगेश डांगे, पोशि/अमोल वाघ, मपोशि/ नम्रता बघेल, चापोहवा भाऊराव खंडाते यांनी तसेच सायबर सेल प्रमुख सपोनि अरंविद सराफ, नापोशि अजय तिवारी, नापोशि चेतन राऊत, पोशि सचिन किनेकर यांनी मोलाची भुमिका पार पाडली.

( अधिक माहीती करीता सपोनि अरविंद सराफ - मो.न. ९८५०५६२२६१ )




अटक आरोपीतांसह स्थानिक गुन्हे शाखा व सायबर सेलचे पोलीस अधिकारी व कर्मचारी